**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
कार्यपत्रिका क्रमांक - ७
**सभावृत्तांत**

दिनांक – **१०/०८/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१०/०८/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपस्थित नसल्याने सोमवार दिनांक १३/०८/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - ७

**सभावृत्तांत**

**(** दिनांक १०/०८/२०१८ ची तहकूब सभा **)**

**दिनांक – १३/०८/२०१८** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दिनांक **१०/०८/२०१८** ची तहकूब सभा **सोमवार** दिनांक **१३/०८/२०१८** रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा.सुजाता सुनिल पालांडे
५. मा.गोफणे अनुराधा देविदास
६. मा.कुंदन अंबादास गायकवाड

या शिवाय मा.चितळे - सहा.आयुक्त , मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.धानोरकर, मा.पाटील, देशमुख, मा.घोडे – कार्य.अभियंता, मा.बहुरे – प्रशासन अधिकारी, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) प्रभाग क्र.२० मधील सरदार वल्लभभाई पटेल येथील हॉल टेबल टेनिससाठी मिळणेबाबत – मा.सुजाता पालांडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मा.क्रीडा कला साहित्य व सांस्कृतिक समितीचा क्रीडा विषयक पाहणी दौरा दिल्ली व पतियाळा येथे आयोजित करणेबाबत - मा.शैलेश मोरे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव

----------

दिनांक २७/०७/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०६) सभावृत्तांत कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३१ विषय क्रमांक – ०१

दिनांक – १३/०८/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.कुंदन गायकवाड अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२५/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – कु.नुपूर लक्ष्मण मोरे, निगडी ,पुणे -४४ यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३२ विषय क्रमांक – ०२

दिनांक – १३/०८/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/४२६/२०१८ दि.२९/०६/२०१८

विषय – सौ.रुपाली गणेश तरवडे यांना आर्थिक सहाय्य अदा करणे बाबत.

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्या वेळेस करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३३ विषय क्रमांक – ०३

दिनांक – १३/०८/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२०४/२०१८ दि.२५/०७/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने सन २०१८ मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१८-१९ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.७,०७,३४०/- अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे व स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.७,०७,३४०/- मधील स्टेज, टेबल, खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था अनुषंगाने करावयाचा खर्च एकूण र.रु.१,३२,२००/- हा स्थापत्य विषयक खर्च, स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.४०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखा शिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.५,३५,१४०/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३४ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १३/०८/२०१८
सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ – मा.सुजाता पालांडे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२० मधील सरदार वल्लभभाई पटेल इमारतीमधील हॉल टेबल टेनिससाठी लिप ऍकडमी स्पोर्टस या संस्थेला नाममात्र दरावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३५ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १३/०८/२०१८
सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा.कुंदन गायकवाड यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अण्णासाहेब मगर स्टेडीयम मोडकळीस आले आहे. त्याची दुरुस्ती व काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. तसेच शहरामध्ये इतरही काही मैदाने व विविध खेळांच्या क्रीडा सुविधा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने दिल्ली येथील इंद्रप्रस्थ स्टेडीयम तसेच पतियाळा येथील क्रीडा संकुल इत्यादी प्रसिध्द मैदानाची पाहणी करुन त्याचा अभ्यास करण्याच्या हेतूने दिल्ली व पतियाळा येथे मा.क्रीडा, कला, साहित्य व सांकृतिक समिती सदस्य, प्रशासन अधिकारी, क्रीडा व क्रीडा अधिकारी यांचा पाहणी दौरा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आयोजित करणे आवश्यक आहे. सबब,पिंपरी चिंचवड शहरामध्ये इतरही काही मैदाने व विविध खेळांच्या क्रीडा सुविधा अधिक चांगल्या प्रकारे उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने दिल्ली येथील इंद्रप्रस्थ स्टेडियम तसेच पतियाळा येथील क्रीडा संकुल इत्यादी प्रसिध्द मैदानाची पाहणी करुन त्याचा अभ्यास करण्याच्या हेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मा.क्रीडा, कला, साहित्य व सांकस्कृतिक समिती सदस्य, प्रशासन अधिकारी, क्रीडा व क्रीडा अधिकारी यांचा दिल्ली व पतियाळा येथे पाहणी दौरा आयोजित करणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी व सदरचा खर्च संबंधित विभागाचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **संजय बबन नेवाळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५३०/२०१८
दिनांक : १४/०८/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.